# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ, अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## पदव्युत्तर शैक्षणिक विभाग

एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

---

जा. क्र./गोवि/पशैवि/ ९५०    दि. २३/०८/२०१९

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संस्थाचालक,**
**विद्यापीठाशी सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**विषयः– उच्च शिक्षण संचालयनामार्फत राबविण्यात येणा–या शिष्यवृत्ती योजनांची महाडिबीटी पोर्टलवरून ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भः– क्र. उशिसं/शिष्य–२०१९/डिबीटी/१०८०२ दि. २०/०८/२०१९**

महोदय,

उपरोक्त सदर्भाकींत विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, मा. संचालक उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य–२०१९/डिबीटी/१०८०२ दि. २०/०८/२०१९ नुसार आपण कार्यवाही घ्यावी व त्याचा अहवाल विद्यापीठ तथा सहसंचालक उच्च शिक्षण यांना कळवावा.

सदर पत्रानुसार कार्यवाही घेतांना कोणतीही दिरंगाई होणार नाही याची नोंद घ्यावी. झाल्यास सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

(दिपक जुनघरे)
उपकुलसचिव (विद्या)
तथा
नोडल अधिकारी(MahaDBT)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in Mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११९५३


क्र.उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/ 10802 दि. २०/०८/२०१९

20 AUG 2019

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, विभाग.

विषय :- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०११४,दि. ३०.०७.२०१९
२. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०२०७,दि. ३१.०७.२०१९
३. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०६९५,दि. ९.०८.२०१९

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. सन २०१९-२० करीता सदरहू पोर्टलद्वारे शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून दि. १.०८.२०१९ पासून अर्ज स्विकारण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे. याबाबत संचालनालयाच्या संदर्भिय पत्रान्वये सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१. माहिती तंत्रज्ञान विभागाने डीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी मेरीट शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. ३१.०८.२०१९ तसेच मेरीट शिष्यवृत्ती वगळून इतर शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. १०.१०.२०१९ निश्चीत केलेली आहे. तथापि विद्यार्थ्यांना अंतिम मुदतीची वाट न पाहता लवकरात लवकर शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरणेबाबत त्यांचे विद्यापीठ / महाविद्यालयामार्फत माहिती देण्यात यावी.

२. तसेच सदर अर्जाची महाविद्यालयाच्या लिपीक व प्राचार्य यांच्या लॉगीनवरुन पडताळणी करण्याची अंतिम मुदत मेरीट शिष्यवृत्तीसाठी दि. १६.०९.२०१९ तसेच मेरीट शिष्यवृत्ती वगळून इतर शिष्यवृत्तीकरीता दि. २३.१०.२०१९ अशी निश्चीत केलेली आहे. तथापि अंतिम मुदतीची वाट न पाहता महाविद्यालयाच्या लॉगीनवर प्राप्त शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी करुन मंजूर अर्ज त्वरीत पुढील टप्प्यावर पाठविण्याबाबत महाविद्यालयांना सूचना देण्यात याव्यात.

३. महाविद्यालयांनी फॉरवर्ड केलेले शिष्यवृत्ती अर्ज विभागीय सहसंचालक कार्यालयाच्या लॉगीनवर पडताळणीसाठी उपलब्ध होतात, अशा अर्जांची पडताळणी करण्याची अंतिम मुदत मेरीट शिष्यवृत्तीसाठी दि. २३.०९.२०१९ तसेच मेरीट शिष्यवृत्ती वगळून इतर शिष्यवृत्तीकरीता दि. ३१.१०.२०१९ अशी आहे. तरी कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय तसेच विभाग स्तरावरील लॉगीनवर शिष्यवृत्ती अर्ज दीर्घकाळ पडताळणीसाठी प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

४. संचालनालयाच्या संदर्भिय पत्रान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त सर्व अकृषी विद्यापीठे तसेच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना त्यांचे डिबीटी प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत तसेच त्यांचे महाविद्यालयामध्ये चालू असलेल्या अभ्यासक्रमाचे शुल्काबाबतची माहिती अद्ययावत करुन त्यास संबंधित विभागीय सहसंचालक / संबंधित विभाग यांचेकडून मान्यता घेण्याबाबतची कार्यवाही जिल्हानिहाय विशेष कार्यशाळांचे आयोजन करुन पूर्ण करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. तथापि अद्यापही आपल्या विभागातील सर्व महाविद्यालयांच्या शुल्क मंजूरीबाबतची कार्यवाही पूर्ण झालेली नसल्याचे निदर्शनास येत आहे. तरी सदरची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा पूर्तता अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
३. मुख्य परिचालन अधिकारी, महाऑनलाईन लि., लोअर पेरल, मुंबई यांना माहितीस्तव.